॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/३०११ दिनांक :०५/११/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** **IKS**(Indian Knowledge System)**, GE/OE** (Generic/Open Elective) व SEC (Skill Enhancement Course) **या विषयाच्या परीक्षे बाबत.**
**संदर्भ:** **मा.विद्या परिषदेच्या बैठकीतील निर्णया प्रमाणे.**

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय तसेच मा.विद्या परिषदेच्या बैठकीतील निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, हिवाळी-२०२४ च्या प्रथम सत्राच्या परीक्षेतील IKS (Indian Knowledge System), GE/OE (Generic/Open Elective) व SEC (Skill Enhancement Course) या विषयाच्या परीक्षे बाबत खालील सूचने प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. IKS (Indian Knowledge System) या विषयाची परीक्षा दिनांक १०/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या कालावधीत घेण्यात यावी. सदर विषयाची प्रश्नपत्रिका विद्यापीठामार्फत तयार करून संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या वेबमेलवर ऑनलाईनपध्दतीने पाठविण्यात येणार असून सदर परीक्षा त्या त्या महाविद्यालयाने घेवून त्याचे मूल्यांकन महाविद्यालयातच करुन त्याचे गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलमध्ये भरावे. तसेच मूळ गुणयादी व उत्तरपुस्तिका परीक्षा विभागाच्या केंद्रीय मूल्यांकन केंद्रामध्ये पाठविण्यात यावी.

२. GE/OE (Generic/Open Elective) या विषयाची परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात यावी व या विषयाच्या परीक्षेचे वेळापत्रक महाविद्यालय स्तरावर तयार करण्यात यावे. या विषयाची प्रश्नपत्रिका महाविद्यालय स्तरावरच तयार करण्यात यावी. सदर विषयाची प्रश्नपत्रिका ही ४० गुणाची राहणार असून त्यामध्ये प्रत्येकी दहा गुणाचे एकुण सहा प्रश्न असतील. त्यापैकी प्रहिला प्रश्न (प्रश्न क्रं. १) सोडविणे अनिवार्य आहे उर्वरीत प्रश्न क्रमांक २ ते ६ पैकी कोणतेही तीन प्रश्न सोडविण्यात यावेत. या विषयाच्या परीक्षेचे मूल्यांकन महाविद्यालय स्तरावर करण्यात येवून सदर परीक्षेचे गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या पोर्टमध्ये भरुन सादर करावीत

३. Skill Enhancement Course (SEC) या विषयाची परीक्षा प्रात्यक्षिक परीक्षेप्रमाणे महाविद्यालय स्तरावर घेण्यात यावी. सदर विषयाच्या परीक्षेचे वेळापत्रक महाविद्यालय स्तरावर तयार करण्यात यावे, तसेच या विषयाची प्रश्नपत्रिका महाविद्यालय स्तरावर तयार करण्यात यावी. सदर विषयाची प्रश्नपत्रिका ही ५० गुणाची राहील. सदर परीक्षेचे गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या पोर्टमध्ये भरुन सादर करावीत

सबब, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ